महाज्योती
— जनदीप समतेचा —

# महाराष्ट्र शासन

## इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
**दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com**

जा.क्र. महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/2207/2024-25 दिनांक :-30/08/2024

# परिपत्रक

**विषय :- नाशिक जिल्हाधिकारी, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती, नागपूर व उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री वसतीगृहातील जागांसाठी प्रतिक्षा यादीकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.**

शासन निर्णय क्रमांक : वसति 5317/प्र.क्र.9/मशि-2 दि.18 ऑक्टोंबर 2022 अन्वये मातोश्री मुलींचे शासकीय वसतिगृह, सरस्वती नगर, धात्रक फाटा, पंचवटी, नाशिक येथे छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था सारथी, पुणे यांच्यामार्फत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा लक्षीत गटातील 75 मुलींसाठी व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाज्योती, नागपूर यांच्यामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या गटातील 75 मुलींसाठी तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील 50 मुलींसाठी अशा प्रकारे लक्षित घटकातील एकूण 200 मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्यात आलेले आहे.

मातोश्री वसतीगृहातील जागांसाठी प्रतिक्षा यादीकरीता **दि.03/09/2024** पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर योजनेकरीता आवश्यक निकष, अटी व शर्ती याबाबतची संपुर्ण माहितीचे परिपत्रक महाज्योतीच्या **www.mahajyoti.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच इच्छूक मुलींनी महाज्योतीच्या संकेतस्थळावर Notice Board येथे जाऊन **"Application for Nashik Matoshri Hostel"** यावर Online अर्ज करावा. तसेच त्याची प्रिंट काढून खालील पत्यावर आवश्यक कागदपत्रे जोडून प्रत्यक्ष अथवा स्पीड पोस्टाने जमा करावा.

**महाज्योती विभागीय कार्यालय**

**पत्ता** :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, समाज कल्याण कार्यालय,
नाशिक पुणे - रोड, नाशिक - 422011

**संपर्क** - 808757693 **ई मेल** - mahajyotinsk@gmail.com **संकेतस्थळ** - www.mahajyoti.org.in

(स्वा)
(राजेश खवले)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर